# जिल्हा परिषद, कोल्हापूर
## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष (DWSM)
जूनी प्रशासकीय इमारत, कागलकर हाऊस, नागाळा पार्क, कोल्हापूर संपर्क ०२३१-२६५१०४४, ई मेल : nbakolhapur@gmail.com


---

## जिल्हा परिषदेला सामाजिक बांधिलकीतून (सी.एस.आर ) एच.डी.एफ.सी बँकेकडून सॅनिटरी व्हेंडींग मशीन प्रदान

कोल्हापूर : ९/५/२०१८

मासिक पाळी व्यवस्थापन हा महिलांच्या,किशोरवयीन मुलींच्या आरोग्याशी निगडीत अत्यंत महत्वाचा विषय आहे.या विषयांतर्गत सामाजिक बांधिलकी (CSR) म्हणून आज रोजी एच.डी.एफ.सी बँकेकडून जिल्हा परिषद मुख्यालयामध्ये ॲटोमॅटिक सॅनिटरी व्हेंडीग मशीन प्रदान करण्यात आले.हा कार्यक्रम मा.सौ.शौमिका महाडिक,अध्यक्षा,जि.प.कोल्हापूर,मा.डॉ.कुणाल खेमनार,मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.कोल्हापूर,मा.श्री.सर्जेराव पाटील,उपाध्यक्ष,जि.प.कोल्हापूर यांचे उपस्थित संपन्न झाला.

महिलांचे आरोग्य चांगले असणे अत्यंत आवश्यक आहे.यामध्ये मासिक पाळी दरम्यान वैयक्तिक स्वच्छता महत्वाची असते. यासाठी या कालवधीमध्ये पॅड वापरल्यास स्त्रियांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. यासाठी शासकिय कार्यालयांमध्ये कार्यरत असणा-या महिलांना तसेच अभ्यागत महिलांना देखील सॅनिटरी पॅड सहज उपलब्ध व्हावेत.या अनुषंगाने दोन मशीन एच.डी.एफ.सी बँकेकडून CSR च्या माध्यमातून जिल्हा परिषदेला देण्यात आली आहेत.

व्हेंडीग मशीन हे ॲटोमॅटिक सिस्टिम असल्याने रू.५ /- चे कॉईन त्यामध्ये घातल्यास तात्काळ पॅड उपलब्ध होते. या व्हेंडींग मशीनसोबतचं डीस्पोजल मशीन ही देण्यात आले असून ते पर्यावरणपुरक आहे.त्यामुळे सॅनिटरी पॅडची उपलब्धता आणि वापरलेल्या पॅडचे सुयोग्य व्यवस्थापन या मशीनच्या माध्यमातून होणार आहे.

या वेळी महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती मा.सौ.शुभांगी शिंदे, शिक्षण व अर्थ समिती चे सभापती मा.श्री.अंबरिश घाटगे,मा.श्री.विशांत महापूरे,समाजकल्याण सभापती,मा.श्री.अरूणराव इंगवले,जि.प.सदस्य तसेच मा.श्रीम.प्रियदर्शनी मोरे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पा.व स्व.),मा.श्री.सोमनाथ रसाळ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(म.बा.क)तसेच सर्व सन्मानिय सदस्य,जि.प.कोल्हापूर आदी.उपस्थित होते.त्याचं बरोबर एच.डी.एफ.सी बँकेचे सिनीअर मॅनेजर मा.श्री.विजय कांबळे,मॅनेजर मा.श्री.संतोष नेर्लेकर व मोहित दळवी उपस्थित होते.यासाठी मा.सौ.स्मिता कळसापनावर,सोहम एंटरप्रायजेस यांनी उपस्थित महिलांना मशीनच्या वापराबाबत प्रात्यक्षिक दाखविले व मार्गदर्शन केले.

---

उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(पा.व स्व.)
जिल्हा परिषद, कोल्हापूर